सर्वांना सोबत घेऊन वाटचाल करणार!
आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन

मंगळवारी पनवेल येथे
होणार पक्षप्रवेश सोहळा

नितीन गडकरी यांच्यासह
मान्यवरांची लाभणार उपस्थिती

पनवेल : पनवेल

राज्यात संवेदनशील बनलेला टोलचा प्रश्न सोडविण्याचे आश्वासन भाजप नेत्यांनी दिले आहे. टोलबरोबरच पनवेल परिसरातील अन्य समस्या दूर करण्यासाठी मी येत्या मंगळवारी (दि. २३) भारतीय जनता पक्षात प्रवेश करीत आहे. सर्वांना सोबत घेऊनच माझी पुढची वाटचाल असेल, असे मा. आमदार प्रशांत ठाकूर यांनी शनिवारी (दि. २०) येथे पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

खारघर–कामोठे येथील टोलनाक्यातून स्थानिकांना सुट देण्याचा निर्णय राज्यातील काँग्रेस सरकारने न घेतल्याने मी आधी जाहीर केल्याप्रमाणे आमदारकीचा राजीनामा दिला. विधानसभा निवडणूक न लढविण्याचा पवित्राही मी घेतला होता, पण पनवेलच्या सर्वांगीण विकासासाठी निवडणूक लढवाच, असा आग्रह कार्यकर्त्यांनी माझ्याकडे धरला. कार्यकर्त्यांचा आग्रह आणि लोकभावना लक्षात घेऊन मी निवडणुकीसाठी सज्ज होत आहे, असे प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

बदलत्या काळाचा वेध घेत देशातील जनतेने नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान केले. पंतप्रधानांनीही सर्व घटकांना सोबत घेऊन देशाला प्रगतिपथावर आणण्यासाठी धोरणात्मक काम सुरू केले आहे. त्यांनी राजकीय विधीनिवेश बाजूला ठेवून महापुराने उद्ध्वस्त झालेल्या जम्मू–कश्मिरसाठी तातडीने कोट्यवधी रुपयांची मदत जाहीर केली, याकडे प्रशांत ठाकूर यांनी लक्ष वेधले.

रायगड जिल्ह्यात भाजपचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील व त्यांचे सहकारी पक्षवाढीसाठी प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या खांद्याला खांदा लावून पक्ष मजबुत करण्यासाठी मी जोमाने प्रयत्न करेन, अशी ग्वाही प्रशांत ठाकूर यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना दिली.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली टोलप्रश्नी करण्यात आलेले आंदोलन, मुख्यमंत्री व अन्य मंत्र्यांकडे केलेला पाठपुरावा, राजीनाम्याचा दिलेला इशारा, स्थानिकांना टोलसुट न मिळाल्याने राजीनामा दिल्यानंतर घडलेल्या सर्व घडामोडी यांची इत्यंभूत माहिती दिली. कार्यकर्त्यांच्या मागणीनुसार भारतीय जनता पक्षात जात असल्याचे ते म्हणाले.

एकीकडे राज्यातील काँग्रेस सरकार जनतेचा भ्रमनिरास करीत असताना दुसरीकडे भाजपने केंद्रात सत्तेवर येताच विकासावर भर दिला आहे. त्याचवेळी भाजप नेते हे पदाधिकारी, कार्यकर्त्यांना पाठबळ देत आहेत. काँग्रेसने विधानसभा निवडणुकीच्या आधी आयत्या वेळी विविध पदे भरली. केंद्रातील भाजपने सत्तेवर येताच जेएनपीटीच्या विश्वस्तपदी पदाधिकाऱ्यांना संधी दिली. हा फरक या दोन पक्षांत आहे, असे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दाखवून दिले.

राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या कारभारावर त्यांचे सहकारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीच ताशेरे ओढले. शरद पवार यांनी तर फायलींवर सही करायला लकवा मारतो का, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांना फटकारले होते, याची आठवण लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी करून दिली. दोन्ही पवारांनी आघाडी होते का ते पाहा व मगच निर्णय घ्या, असे फोनवरून सूचितपणे सांगितले होते. शेकापच्या दोन नेत्यांनीही, एकत्र आलो तर बरे होईल, असे म्हणत पक्षप्रवेशासंदर्भात संपर्क साधला होता, अशी माहिती रामशेठ ठाकूर यांनी पत्रकारांना दिली.

शिक्षकी पेशा सोडल्यानंतर १९७६ ते १९९५ या काळात मी शेकापमध्ये किंगमेकर म्हणून काम करीत होतो. १९९८ मध्ये मला पक्षाच्या नेत्यांनी थेट लोकसभा निवडणूक लढविण्यास मला सांगितले. ९८ व ९९ अशा दोन्ही वेळा मी विजयी झालो. डिसेंबर २००४ मध्ये मी काँग्रेसमध्ये आलो. त्यानंतर आतापर्यंतच्या कालावधीत मी व्यवसाय करतोय. राजकारण आणि उद्योग याची मी गल्लत केली नाही. तसे असते तर माझ्या प्रतिस्पर्धी उद्योगपतींना माझ्यापेक्षा जास्त कामे मिळालीच नसती, असे त्यांनी स्पष्ट केले. याबद्दल माझ्यावर कुणी आरोप करीत असेल, तर त्याने कधीही, कुठीही सांगावे मी चर्चा करायला तयार आहे. तुम्ही पत्रकारही सोबत असाल. मी खोटा ठरलो तर माझी सर्व प्रॉपर्टी आरोप करणाऱ्याला देण्यास मी तयार आहे, असे खुले आव्हान रामशेठ ठाकूर यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना दिले.

या पत्रकार परिषदेस लक्ष्मणशेठ पाटील, वाय. टी. देशमुख, भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य नंदकुमार पटवर्धन, नितीन मुनोथ, ॲड. आशा भगत हेही उपस्थित होते.

पक्षप्रवेश समारंभाची जोरदार तयारी

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि मा. आमदार प्रशांत ठाकूर असंख्य समर्थकांसह येत्या मंगळवारी (दि. २३) भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार आहेत. हा पक्षप्रवेश समारंभ पनवेल येथील छत्रपती संभाजी महाराज मैदानावर दुपारी ३.३० वाजता होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे निकटवर्ती भाजपचे ज्येष्ठ नेते तथा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या पक्षप्रवेश सोहळ्यास विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते विनोद तावडे, विधानसभेचे विरोधी पक्षनेते एकनाथ खडसे, प्रदेशाध्यक्ष देवेंद्र फडणवीस, माजी प्रदेशाध्यक्ष सुधीर मुनगंटीवार आदी मान्यवर उपस्थित राहाणार आहेत. पक्षप्रवेश समारंभाची जोरदार तयारी सुरू झाली आहे.